नियमीत दिवाणी दावा क्रमांक ४४२/२०१२
स्वराज व एक विरूध्द रमेश.
**CNR.MHBI1100170422012**

## निशाणी ४९ खालील आदेश

(पारीत दिनांक २०.०६.२०१९)

**१.** प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज प्रतिवादींनी दि.प्र.सं. आदेश १२ नियम २ अन्वये प्रतिवादींनी सदर दाव्यात दाखल केलेले दस्तऐवज हे कबुल करण्याबाबतची नोटीस व नोंदणीकृत खरेदीखताच्या सत्यप्रतींना निशाणी देणे करीता दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादींनी प्रतिवादी विरूध्द वादग्रस्त जमीनीचे वाटप करून स्वतंत्र ताबा मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे व वादींचा सदरचा दावा सध्या मे. कोर्टात पेंडीग आहे. सदर दाव्यात वादी क्र. २ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे व वादींना प्रतिवादीतर्फे उलट तपास करणे बाकी आहे.

**३.** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्यात प्रतिवादींनी खालील नमुद कागदपत्रे त्यांचा पुरावा म्हणुन पुर्वीच मे. कोर्टात दिनांक १८.०४.२०१७ रोजी अर्जासोबत व कागदपत्राच्या यादी सोबत दाखल केलेली आहेत. सदर पाच रजिस्टर्ड खरेदीखते हे दिनांक १८.०४.२०१७ च्या कागदपत्राच्या यादीमध्ये अनुक्रमांक ११ ते १५ वर समाविष्ट आहेत त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ. क्र. | कागदपत्राचा क्रमांक व दिनांक |
|---|---|
| १. | रजिस्टर्ड खरेदीखत अनुक्रमांक नंबर — १९४८/१९८३ दिनांक १९.०९.१९८३ ची सर्टीफाईड नक्कल. |
| २. | रजिस्टर्ड खरेदीखत अनुक्रमांक नंबर — १८२२/१९८५ दिनांक २३.०८.१९८५ ची सर्टीफाईड नक्कल. |
| ३. | रजिस्टर्ड खरेदीखत अनुक्रमांक नंबर — ७९६/२००७ दिनांक २३.०२.२००७ ची सर्टीफाईड नक्कल. |
| ४. | रजिस्टर्ड खरेदीखत अनुक्रमांक नंबर — ४३९७/२००९ दिनांक ०९. |

| | |
|---|---|
| | ०७.२००९ ची सर्टीफाईड नक्कल. |
| ५. | रजिस्टर्ड खरेदीखत अनुक्रमांक नंबर — ४४१९/२००९ दिनांक १०.०७.२००९ ची सर्टीफाईड नक्कल. |

**४.** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, उपरोक्त नमुद पाच रजिस्टर्ड खरेदीखतापैकी रजिस्टर्ड खरेदीखत नंबर ४३९७/२००९, दिनांक ०९.०७.२००९ या खरेदीखतामध्ये खरेदीखत लिहुन घेणार म्हणुन वादी क्र. २ सिमा भ्र. रमेश पिंपळे या आहेत व सदर रजिस्टर्ड खरेदीखतावर वादी क्र. २ सिमा भ्र. रमेश पिंपळे यांची खरेदीखत लिहुन घेणार म्हणुन सही आहे.

**५.** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी मे. कोर्टात पुरावा म्हणुन दाखल केलेल्या उपरोक्त नमुद पाच दस्तऐवजाच्या सर्टीफाईड नकला मधील मजकुर कंन्टेटस व एक्झीक्युशन हे वादींना मान्य आहेत काय याबाबत प्रतिवादींतर्फे वादींना सदरची नोटीस देण्यात येत आहे. सदर दाव्यातील पुरावा व उलट तपास कर्टाईल करण्याच्या दृष्टीने प्रतिवादींनी सदरची नोटीस वादींना दिली आहे. सदर नोटीसवर मे. कोर्टाने वादीचे म्हणणे घेउन जर उपरोक्त नमुद पाचही दस्तऐवजाच्या सर्टीफाईड नकला मधील मजकुर कंन्टेटस व एक्झीक्युशन वादींना कबुल असतील तर उपरोक्त नमुद पाचही रजिस्टर्ड खरेदीखताच्या सर्टीफाईड नकला ज्या सदर दाव्यात प्रतिवादींनी मे. कार्टात दिनांक १८.०४.२०१७ रोजी दाखल केल्या आहेत त्या पाचही रजिस्टर्ड खरेदीखताच्या नकलांना निशाणी सी देण्याचा व त्या सदर दाव्यात प्रतिवादीचा पुरावा म्हणन स्वीकरण्याची विनंती केली आहे.

**६.** वादींना सदर अर्जास निशाणी ४९ कडे म्हणणे देऊन अर्जास हरकत घेतली. वादींनी खरेदीखत क्र. ४३९७/२००९ हेच खरेदीखत मान्य आहे व त्यातील मजकुर मान्य आहे असे कथन केलेले आहे. उर्वरीत खरेदीखतासाठी वादीचा काही एक संबंध नाही. तरी योग्य तो आदेश होण्याची गरज आहे व वादीस खरेदीखते मान्य नाहीत असे कथन केलेले आहे.

**७.** वादीतर्फे विधीज्ञ श्री. जे.जे. पट्टे व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.

डि.एम. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

८. उपरोक्त कथनांचा विचार करता, प्रथम कायदयातील तरतुद नमुद करावी लागेल. दिवाणी प्रक्रिया संहिता **आदेश १२ नियम २अ** मध्ये नमुद केले आहे की,

**आदेश १२ नियम २अ** :— दस्तऐवज कबुल करण्यासाठी नोटीस बजावल्यानंतर नाकबुल करण्यात आले नाहीत तर ते मान्य करण्यात आल्याचे समजण्यात यावयाचे :—

१) *पक्षकराला जो दस्तऐवज कबुल करण्याविषयी सांगण्यात आले असेल, अथवा त्या पक्षकाराच्या वादकथनाला किंवा दस्तऐवज कबुल करण्याविषयीच्या नोटीशीच्या उत्तरामध्ये तो कबुल न केल्याचे नमुद करण्यात आले नसेल तर तो दस्तऐवज नि:समर्थ व्यक्तीची बाब वगळून एरव्ही कबुल असल्याचे मानण्यात येईल. परंतु, न्यायालय स्वविवेकानुसार व लेखीकारणे नमुद करून अशाप्रकारे कबुल करण्यात आलेला कोणताही दस्तऐवज अशा कबुली व्यतिरिक्त अन्य प्रकारे शाबीत करण्यास फर्मावू शकेल.*

२) *एखादा पक्षकार, दस्तऐवज कबुल करण्यासंबधीची नोटीस त्यावर बजावण्यात आल्यानंतर तो दस्तऐवज कबुल करण्याकडे गैरवाजवी दुर्लक्ष करील किंवा त्यास नकार देईल त्या बाबतीत न्यायालय, त्याने दुस—या पक्षकारास नुकसान भरपाई म्हणुन खर्च द्यावा लागेल असा निदेश त्यास देउ शकेल.*

९. वरील नमुद कायदयातील तरतुदींच्या अनुषंगाने वादीचे कथनावरून असे स्पष्ट होते की, वादींना फक्त खरेदीखत क्र. ४३९७/२००९ हेच मान्य असुन त्यातील मजकुर देखील मान्य आहे. याउलट उर्वरीत खरेदीखताबाबत वादीचा काहीही संबंध नसलेचे कथन केलेचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे ती खरेदीखते वादीस मान्य नाहीत असे स्पष्टपणे सांगीतले हे देखील स्पष्ट होते. एकंदर वादीस खरेदीखत क्र. ४३९७/२००९ चे

एक्झीक्युशन व त्यातील मजकुर मान्य असलेची कबुली दिलेमुळे त्या दस्तऐवजास निशाणी देणे योग्य होईल व सदरचा दस्तऐवज दाव्यात पुरावा म्हणुन स्वीकारणे संयुक्तीक होईल. त्याचप्रमाणे प्रस्तुत अर्जात अनुक्रमांक १ ते ३ व ५ लगत नमुद केलेल्या खरेदीपत्रांशी वादींचा काहीही संबंध नाही असे कथन केलेमुळे व सदरची खरेदीखते मान्य नाहीत असे स्पष्टपणे सांगीतलेमुळे सदर खरेदीपत्रांना निशाणी देणे योग्य होणार नाही. त्यामुळे अनुक्रमांक १ ते ३ व ५ कडील दस्तऐवज शाबीत करणेची सर्वस्वी जबाबदारी प्रतिवादी यांची आहे. या कारणास्तव अर्जातील नमुद दस्तऐवज १ ते ३ व ५ कडील दस्तऐवज कायदयातील तरतुदींच्या अनुषंगाने शाबीत करणे आवश्यक आहे. उपरोक्त विवेचनानुसार, फक्त खरेदीखत क्र. ४३९७/२००९ या दस्तऐवजास निशाणी देण्याबाबतचा आदेश पारित करणे योग्य होईल. सबब खालीलप्रमाणे आदेशी पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजुर करणेत येतो. |
| २. | नोंदणीकृत खरेदीखत अनुक्रमांक ४३९७/२००९ दिनांक ०९.०७.२००९ या दस्तऐवजास पुढील निशाणी देण्यात येते व तो दस्तऐवज पुरावा म्हणुन स्वीकारणेत येतो. |
| ३. | अर्जातील नमूद क्र. १ ते ३ व ५ या दस्तऐवजांना निशाणी देणेबाबतची केलेली विनंती नामंजुर करणेत येते. |
| ४. | खर्चाबाबत आदेश नाही. |

सही/—

दिनांक : २०.०६.२०१९ (एस.आर. शिंदे)

३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई.